नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 20/10/2023 (शुक्रवार) सकाळ

# जबरी चोरी करून सोन्याचांदीचे दागिने लुटणारा आरोपी जेरबंद

## सुमारे ८१८६२/— रुपयांचा मुद्देमाल जप्त,
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणची कार्यवाही

दिनांक १५/१०/२०२३ रोजी फिर्यादी मारोती धोंडबा मेश्राम हे आपले पत्नीसह शेतातील घराबाहेर खुर्चीवर बसले असता त्या ठिकाणी काही दिवासा आधी फिर्यादीचे शेतातील घरी आलेला अनोळखी ईसम काळया रंगाची स्कुटी सारखी दिसणारी गाडी घेवुन फिर्यादीकडे आला व थोडी चर्चा करुन फिर्यादीचे पाठीमागुन येवुन अनोळखी ईसमाजवळ असलेली मिरची पावडर फिर्यादीचे दोन्ही डोळयावर फेकल्याने फिर्यादी स्वत:चे डोळे चोळत असताना घटनास्थळी हजर असलेली फिर्यादीची पत्नी सौ. राधा मारोती मेश्राम हिचे गळयात असलेले सोन्याचे दागिने असा एकुण किंमती २०,०००/—रुपयाचा मुद्देमाल गळयातुन जबरीने हीसकावुन तेथुन पळुन गेला. हया गंभीर घटनेबाबत पोलीस स्टेशन उमरेड येथे अनोळखी इसमांविरुध्द गुन्हे रजि. नं. ६०८/२०२३ कलम ३९२ भादवि अन्वये जबरी चोरीचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से) यांनी सदर जबरी चोरीच्या गुन्हयाचा समांतर तपास कामी स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणचे विशेष पथक तयार केले. दिनांक १८/१०/२०२३ ते दिनांक १९/१०/२०२३ रोजी पोलीस स्टेशन उमरेड येथील अप. क्र. ६०८/२३ कलम ३९२ भादंवि गुन्हयाचे समांतर तपासा दरम्यान वरिष्ठांनि दिलेल्या आदेशानुसार गुन्हयातील आरोपीचा शोध घेतला असता तांत्रिक पद्धतीने तसेच आरोपीचे वर्णनावरून गुन्हा हा आरोपी इक्बाल टकला उर्फ आमीन शेख इब्राहिम शेख वय ३० वर्ष, रा. मोठा ताजबाग नागपूर याने केला असावा व त्याचे शोधकामी त्याचे घरी ताजबाग येथे पोलीस पथक गेले असता तो घरी मिळुन आला नाही. खबऱ्यांनी दिलेल्या महितीप्रमाणे तो पांढुर्णा येथे पळुन गेल्याचे समजले. लगेच वरिष्ठांनि दिलेल्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पांढुरणा येथे जाऊन आरोपीचा बसस्टॉप, रेल्वे स्थानक, पांढुरणा परिसर व लॉजस मध्ये शोध घेतला असता आरोपी इक्बाल टकला उर्फ आमीन शेख इब्राहिम शेख वय ३० वर्ष, रा. मोठा ताजबाग नागपूर हा आकाश लॉज पांढुरणा येथे मिळून आला. आरोपीला सदर गुन्हयाबाबत सखोल विचारपूस केली असता आरोपीने गुन्हा केल्याचे सांगून गुन्हयात जबरी चोरी केलेला मुद्देमाल हरडे ज्वेलर्स नागपूर याला विकला असल्याचे सांगितले वरून आरोपीस ताब्यात घेऊन नागपूर येथे येऊन गुन्हयातील १) १० ग्रॅम सोन्याची लगड किंमती ६१८६२/— २) गुन्हयात वापरलेली मोपेड क्र. MH31 DU 1957 किंमती २०,०००/— असा एकूण ८१८६२/— रुपयाचा १००% टक्के मुद्देमाल जप्त करून जबरी चोरीचा गुन्हा उघडकीस आणला. गुन्हयात वापरलेली मोटरसायकल ही पोस्टे बुट्टीबोरी येथील अप क्र. ८०४/२०२३ कलम ३७९ भादंवि. मोटरसायकल चोरीच्या गुन्हयातील असल्याने स्थानिक गुन्हे शाखेने जबरी चोरीचा व मोटरसायकल चोरीचा असे दोन गुन्हे उघडकीस आणले. जप्त मुद्देमाल, कागदपत्रे, आरोपी पुढील तपास प्रक्रियेकरिता पोलीस स्टेशन उमरेडचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से) तसेच मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात स्थानिक गून्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे,

पोलीस उपनिरीक्षक आशिष मोरखडे, पोलीस हवालदार अरविंद भगत, गजेंद्र चौधरी, उमेश फुलबेल, रोशन काळे, पोशी राकेश तालेवार, अभिषेक देशमुख चालक पोशी आशुतोष लांजेवार, विशेष तांत्रिक मदत पोलीस नायक सतीश राठोड सायबर सेल ना.ग्रा. यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**